ePaper

## भाजपला रिंगणात एमआयएमचा उमेदवार हवा; रावसाहेब दानवे



| वर्ष - 7 | अंक - 113 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत


- फायनलमध्ये प्रज्ञानंदचा पराभव!
- रामायणातून आलियाची माघार
- महिलांना मातृत्व रजेचा हक्क!
- राज्यातील अनेक जिल्हे तहानलेले!


www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 25 ऑगस्ट 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# ‘सुविधा पार्क’ च्या रस्त्याला संरक्षण मंत्रालयाचा ‘हिरवा कंदिल’!

## गेल्या 13 वर्षांपासून प्रश्न अखेर सुटला

### स्थानिक सोसायटीधारकांना मिळाला दिलासा



**| पिंपरी | महाईन्यूज | प्रतिनिधी |**

**कॉलेज ऑफ मिलिटरी इंजिनिअरिंग अर्थात ‘सीएमई’च्या हद्दीतील पुणे-नाशिक महामार्ग ते भोसरीतील सुविधा पार्क सोसायटीला जोडणारा १२ मीटर रस्ता विकसित करण्यासाठी संरक्षण विभागाकडून परवानगी मिळाली आहे. त्यामुळे स्थानिक सोसायटीधारकांना दिलासा मिळणार आहे.**



चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर विकास योजनेमध्ये मौजे भोसरी येथील स.नं.६८९, ६९० रहिवाशी विभाग दर्शविलेला असून, पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्ग क्र.५० पासून सी.एम.ई. गेटकडे जाणारा रस्ता आहे. सन २०१० मध्ये सी. एम. ई. कडून सदर भागासाठी असलेला पोहच रस्ता संरक्षण विभागाचा असल्याने नागरीकांच्या वाहतुकीस सदर रस्ता बंद करण्यात आला होता. परिणामी, सुविधा पार्क सहकारी गृहरचना संस्थांच्या रहिवाश्यांनी न्यायालयाकडे दाद मागितली होती. परंतु, ही याचिका न्यायालयाने फेटाळली होती. दरम्यान, सदरचे क्षेत्र महानगरपालिकेच्या नियंत्रणाखाली आलेपासून पुणे-नाशिक रस्त्यापासून सी.एम.ई. गेटकडे जाणा-या सदर रस्त्याचे वेळोवेळी महानगरपालिकेमार्फत डांबरीकरण करण्यात आलेले आहे. तसेच, स्टेशन हेड क्वार्टर खडकी येथे दि. ०७/०९/२०२१ रोजी एकत्रित बैठक घेण्यात आली. त्यानुसार, संरक्षण विभागाकडून महानगरपालिकेकडे मनपा प्रयोजनासाठी जागा हस्तांतरीत करणेबाबत सहमती दर्शवली होती. पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाकडून भोसरी येथील सुविधा पार्क व बाजूच्या रहिवास भागासाठी असलेला पोहच रस्ता मिलीटरी विभागाकडून महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करणेबाबतचा प्रस्ताव ऑनलाईन पद्धतीने आवश्यक तपशील व नकाशा संरक्षण मंत्रालय, दिल्ली यांना सादर करण्यात आला होता. त्याला संरक्षण विभागाने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.



“ माझ्या राजकीय जीवनाची सुरूवात ज्या परिसरातून झाली. त्या परिसरातील सुविधा पार्क व समर्पण सोसायटी आणि सभोवतालच्या भागातील नागरिकांचा रस्त्याचा प्रश्न गेल्या १३ वर्षांपासून प्रलंबित होता. सुमारे ७५ हून अधिक सदनिकाधारकांना रस्ताच नव्हता. त्यामुळे सोसायटीधारक नागरिकांनी न्यायालयातील याचिका मागे घेतली. त्यामुळे संरक्षण विभागाने सकारात्मक भूमिका घेत सदर रस्ता महापालिका प्रशासनाकडे हस्तांतरण करण्यास परवानगी दिली आहे. अत्यंत गुंतागुंताचा हा प्रश्न महापालिका, रहिवाशी आणि संरक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी सामंजस्याने मार्गी लावला. प्रशासनाने पुढील कार्यवाही करुन रस्त्याचे काम पूर्ण करावे.

**- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा**

### असा निघाला तोडगा!

» सुविधा पार्क सोसायटीचे सदस्य व महानगरपालिकेचे अधिकारी तसेच स्टेशन कमांडंट, स्टेशन हेड क्वार्टर, खडकी, डिफेन्स इस्टेट ऑफिस, पुणे यांच्या समवेत महापालिका आयुक्त यांच्या दालनात आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने बैठक झाली होती. यामध्ये सुविधा पार्क सोसायटीचे सदस्य न्यायालयातील प्रकरण मागे घेतील आणि महापालिकेने पाठविलेला प्रस्ताव संरक्षण मंत्रालयाद्वारे स्वीकारला जाईल व ही जागा पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केली जाईल. तसेच सुविधा पार्क सोसायटी सदस्यांनी न्यायालायात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राची प्रत ७ दिवसांत सादर करण्याचे निश्चित झाले होते. त्यानुसार, सुविधा पार्क सोसायटीच्या प्रतिनिधींनी दावा मागे घेतल्यानंतर संरक्षण विभागाने दि.२३/०८/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सदरचा रस्त्याचे काम करण्यासाठी परवानगी दिली आहे, अशी माहिती महापालिका नगर रचना विभागाचे सहायक संचालक संदेश खडतरे यांनी दिली.

### जागेचे शुल्क भरावे लागणार...

»पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या मौजे भोसरी येथील सुविधा पार्क व बाजूच्या रहिवास भागासाठी असलेला पोहच रस्ता मिलीटरी विभागाकडून स.नं.६९० व २४९ येथील रहिवाशी विभागात सुविधा पार्क सहकारी गृहरचना संस्थांच्या इमारत व लगतच्या परिसरात पुणे-नाशिक रस्त्यापासून सी. एम. ई. गेटकडे जाणा-या संरक्षण विभागाच्या आख्त्यारीत असलेल्या रस्त्यापैकी १२.०० मी. रुंद व ४००.०० मी. लांबी अशा ४८००.०० चौ.मी. रस्त्याच्या जागेची र.रु.२३, २४,६४,०००/- इतकी रक्कम कळविलेली आहे. आहे. सदर रस्त्यामुळे सुविधा पार्क येथील व बाजूच्या रहिवास भागासाठी पोहच रस्ता उपलब्ध होणार आहे. त्यामुळे जागेचे शुल्क भरुन महापालिकेला हा रस्ता ताब्यात घ्यावा लागणार आहे.

---

## थेरगाव रुग्णालयात 350 बेडची व्यवस्था

**| पिंपरी | महाईन्यूज | प्रतिनिधी |**

रुग्ण संख्या वाढत असल्याने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या थेरगाव रुग्णालयात बेडची संख्या वाढविण्यात आली आहे. रुग्णालयामध्ये 350 सुसज्ज बेडची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांची गैरसोय टळणार असल्याचे वैद्यकीय विभागाने सांगितले आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेने कोरोना मध्ये चार सुसज्ज रुग्णालये सुरू केली. त्यामध्ये 200 बेडचे थेरगाव रुग्णालय, 130 बेड्चे हभप कै. प्रभाकर मल्हारराव कुटे - आकुर्डी रुग्णालय, 120 बेड्चे नवीन जिजामाता रुग्णालय, 100 बेड्चे नवीन भोसरी रुग्णालय अशी चार रुग्णालय उभारण्यात आली आहेत. जवळ असल्याने या रुग्णालयांमध्ये शहरातील रुग्णांची गर्दी वाढत आहे. थेरगाव रुग्णालयामध्ये महिन्याकाठी 14 हजार रुग्ण



ओपीडीमध्ये दाखल होत असल्याचे अधिकारी सांगत आहेत. या ठिकाणी अद्ययावत स्त्रीरोग विभाग सुरु केला आहे. त्यामुळे प्रसूतीसाठी महिला रुग्णांची देखील मोठी संख्या येत आहे.

वाढणारी लोकसंख्या पाहता जादा बेडची सुविधा रुग्णालया मध्ये देण्यात आली आहे. सुरुवातीला या ठिकाणी 200 बेड कार्यान्वित करण्यात आले होते. त्यामध्ये आता वाढ केली आहे. आणखी 350 बेड करण्यात आले आहे. त्यामुळे रुग्णांना त्वरित उपचार मिळण्यास मदत मिळणार आहे.

# पुणे मेट्रोचा कामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह?

## » चौकशी समिती नियुक्त करून श्वेतपत्रिका काढण्याची मागणी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे मेट्रोच्या विस्तारित मार्गांना प्रवाशांचा प्रतिसाद वाढत असतानाच पावसामुळे मेट्रो स्थानके गळू लागल्याचे विदारक चित्र समोर आले. यामुळे मेट्रोच्या कामाच्या दर्जाबाबत शंका उपस्थित केली जात आहे. या पार्श्वभूमीवर हैदराबाद मेट्रोचे माजी व्यवस्थापकीय संचालक विवेक गाडगीळ यांनी अनेक गंभीर प्रश्न मांडले आहेत.**

याप्रकरणी चौकशी समिती नियुक्त करून श्वेतपत्रिका काढण्याची मागणीही त्यांनी केली आहे. जिल्हा न्यायालय मेट्रो स्थानकात मंगळवारी (ता. २२) अनेक ठिकाणी पावसाचे पाणी गळत होते. जोरदार पाऊस नसूनही गळती सुरू झाल्याने प्रवाशांनी नाराजी व्यक्त केली. गळती सुरू असलेल्या भागात महामेट्रोने बॅरिकेड लावले होते.

तरीही नवीन स्थानक हलक्या पावसातही गळू लागल्याने अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. मेट्रो स्थानकांच्या बांधकामाच्या एकूण दर्जाबाबतही शंका उपस्थित केली जात आहे. याआधीही पुण्यातील काही ज्येष्ठ अभियंत्यांनी मेट्रो स्थानकांच्या बांधकामाबाबत गंभीर मुद्दे मांडले होते. त्यानंतर सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाकडून दुसऱ्यांदा स्थानकांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले होते. त्यावरून मोठा गदारोळ उडाला होता.याबाबत हैदराबाद मेट्रोचे माजी व्यवस्थापकीय संचालक विवेक गाडगीळ म्हणाले, की मेट्रोच्या कामात कोठेही पारदर्शकता नाही. सुरक्षित मेट्रो हा सार्वजनिक हिताचा भाग आहे. त्यामुळे महामेट्रोने कामातील त्रुटी शोधण्यासाठी चौकशी समिती नियुक्त करावी. या समितीने अहवाल दिल्यानंतर श्वेतपत्रिका काढण्यात यावी. आम्ही स्थानकांच्या रचनात्मक सुधारणेबाबत वारंवार प्रश्न उपस्थित केले. मेट्रोकडून यावर समाधानकारक उत्तरे देण्यात आलेली नाहीत. मेट्रोची सुरक्षा हा एकट्याचा प्रश्न नसून, तो संपूर्ण समाजाचा आहे. त्यामुळे लोकांनीही याबाबत प्रश्न विचारायला हवेत.



### दुरुस्तीचे काम सुरू

» जिल्हा न्यायालय स्थानकात वनाझ ते रुबी हॉल आणि पिंपरी-चिंचवड महापालिका ते जिल्हा न्यायालय हे दोन्ही मार्ग एकत्र येतात. विस्तारित सेवा सुरू झाल्यानंतर सर्वाधिक गर्दी असणारे हे स्थानक आहे. या स्थानकाच्या छतातून सूर्यप्रकाश आतमध्ये यावा, अशी रचना करण्यात आली आहे. या जाळीदार छतातून पावसाचे पाणी गळत होते. त्यामुळे महामेट्रोने तातडीने दुरुस्तीचे काम सुरू केले आहे. त्याचबरोबर इतरही स्थानकांचा आढावा घेतला जात आहे, अशी माहिती महामेट्रोतील सूत्रांनी दिली.

> जिल्हा न्यायालयासह काही मेट्रो स्थानकांमध्ये छोट्या-मोठ्या समस्या आढळून आल्या आहेत. त्यांच्या दुरुस्तीसाठी स्वतंत्र पथक नेमण्यात आले आहे. हे पथक प्रत्येक ठिकाणी जाऊन दुरुस्तीचे काम करीत आहे.
> **-हेमंत सोनावणे, कार्यकारी संचालक, महामेट्रो**

> मेट्रो स्थानकांच्या रचनात्मक सुरक्षिततेचा मुद्दा आम्ही उपस्थित केला होता. त्यावर महामेट्रोने काहीच काम केले नाही. मेट्रोच्या कामातील त्रुटी तपासण्यासाठी चौकशी समिती नियुक्त करून श्वेतपत्रिका काढण्यात यावी. या मुद्द्यावर खुली चर्चा करण्याची आमची तयारी आहे. **-विवेक गाडगीळ, माजी व्यवस्थापकीय संचालक, हैदराबाद मेट्रो**

# रिंग रोडच्या भूसंपादनाला वेग!

## »रस्त्याचे 'जीएसआय मॅपिंग' होणार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने हाती घेतलेल्या वर्तुळाकार रस्त्याच्या भूसंपादनाला गती आली असून, आतापर्यंत ४५० कोटी रुपयांचे वाटप झाले असून ६०२ कोटी शिल्लक आहेत. या रस्त्याचे नकाशांद्वारे जीएसआय मॅपिंग होणार आहे.रिंगरोडसाठीच्या भूसंपादनासाठी जिल्हा प्रशासनाकडून बाधितांना नोटीस देण्यात आल्या असून, स्वेच्छेने अगोदर येणाऱ्या शेतकऱ्यांची निवाडा प्रक्रिया राबवून भूसंपादन करण्यात येत असल्याची माहिती रस्ते महामंडळाकडून देण्यात आली. पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील वाहतूककोंडी सोडविण्यासाठी रस्ते महामंडळाने १७२ किलोमीटर लांब आणि ११० मीटर रुंदीचा वर्तुळाकार रस्ता हाती घेण्यात आला आहे.**



### अत्याधुनिक यंत्रणेद्वारे मोजणी

» वर्तुळाकार रस्त्याची पश्चिम आणि पूर्व अशा दोन टप्प्यांत विभागणी करण्यात आली असून, पश्चिम भागाचे मूल्यांकन होऊन निवाडा प्रक्रियेद्वारे सहमती घेऊन भूसंपादन करण्यात येत आहे. यातील पूर्वेकडील चार गावांचा देखील समावेश आहे. पूर्व भागातून मावळ तालुक्यातील ११, खेड १२, हवेली १५, पुरंदरमधील पाच, तर भोरमधील तीन गावे बाधित होणार आहे. त्यानुसार पूर्वेकडील गावांची राज्य शासनाच्या चालू वर्षी जानेवारी महिन्यात घेतलेल्या निर्णयानुसार मूल्यांकन प्रक्रिया राबविण्यात येत असून, नकाशांद्वारे जीएसआय मॅपिंग होणार असल्याचेही रस्ते महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

पूर्व आणि पश्चिम असे दोन भाग करण्यात आले आहेत. पश्चिम भागात भोरमधील पाच, हवेलीतील ११, मुळशीतील १५ आणि मावळातील सहा गावांचा समावेश आहेत. प्रकल्पासाठी ६९५ हेक्टर जमिनीचे संपादन करावे लागणार आहे. त्यानुसार पश्चिम भागातील जमिनींच्या मूल्यांकनाची प्रक्रिया पार पडली आहे. दर निश्चित झाल्यानंतर भूसंपादन नोटीस पाठविण्यात आल्या. मात्र, काही स्थानिक संघटनांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून मूल्यांकन प्रक्रियेत तफावत असल्याच्या तक्रारी केल्या होत्या. तसेच ठरावीक गावातील घर, बागायती शेतीच्या दरात तफावत असल्याचे निदर्शनास आले होते. बाधितांना समांतर मोबदला मिळावा, अशी मागणी करत पाठविण्यात आलेल्या नोटिशीची मुदत वाढवावी, अशी मागणी केली होती. त्यानुसार जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी संबंधित गावकऱ्यांच्या मागण्या पाहून प्रांतनिहाय चौकशीचा आदेश देत नोटिशींबाबत मुदतवाढीचा निर्णय दिल्याने शेतकऱ्यांनी भूसंपादनाला सहमती दर्शवली आहे.या पार्श्वभूमीवर ज्या गावातील नागरिकांच्या हरकती होत्या, त्या नोटिसांमध्ये वेळ वाढवून त्यांच्या हरकती, मागण्यांबाबत प्रांत अधिकारी आणि रस्ते महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी पुन्हा कार्यवाही सुरू केली आहे.

# महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी 'तेजस्विनी'

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

रेल्वेने प्रवास करणाऱ्या महिलांच्या सुरक्षिततेबाबत अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. विशेषतः रात्रीच्या वेळी एकट्याने प्रवास करणाऱ्या महिलांची छेड काढण्याचे आणि त्यांना लुटण्याचे प्रकार वारंवार घडू लागले आहेत. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी रेल्वे सुरक्षा दलाने तेजस्विनी पथकाची स्थापना केली आहे. या पथकातील महिला कर्मचारी रेल्वेने प्रवास करून महिलांच्या सुरक्षिततेची काळजी घेत आहेत. मध्य रेल्वेच्या पुणे विभागात रेल्वे सुरक्षा दलाने हे पथक स्थापन केले आहे. या पथकाकडे केवळ प्रवासी महिलाच नव्हे, तर मुलांच्या सुरक्षिततेचीही जबाबदारी आहे. तेजस्विनी पथकाचे काम स्वातंत्र्य दिनापासून सुरू झाले. या पथकात सहायक उपनिरीक्षक पूनम शर्मा आणि दोन महिला कर्मचारी आहेत. हडपसरच्या निरीक्षक प्रीती कुलकर्णी यांच्याकडे या पथकावर देखरेखीची जबाबदारी आहे. तेजस्विनी पथकाकडून दररोज डेक्कन, इंटरसिटी, सिंहगड एक्स्प्रेस आणि दैनंदिन लोकल गाड्यांमधील महिला प्रवाशांशी संवाद साधून त्यांच्या सुरक्षिततेविषयक अडचणी जाणून घेण्यात येत आहेत.महिलांवरील हिंसाचाराला आळा घालण्यासाठी रेल्वे हेल्पलाइन क्रमांक १३९ आणि विभागीय सुरक्षा नियंत्रण कक्ष क्रमांक ७२१९६१३७७७ उपलब्ध आहेत. याबाबत महिला प्रवाशांमध्ये जनजागृती केली जात आहे. वरिष्ठ विभागीय सुरक्षा आयुक्त उदयसिंह पवार यांच्या नेतृत्वाखाली हा जनजागृतीचा कार्यक्रम सुरू आहे, अशी माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. रामदास भिसे यांनी दिली. तेजस्विनी पथकाने एक व्हॉट्सॲप समूह तयार केला आहे. त्यात रेल्वे सुरक्षा दलाचे पुणे, शिवाजीनगर, हडपसर स्थानकांचे निरीक्षक आणि विभागीय सुरक्षा नियंत्रण क्रमांक, निरीक्षक प्रवासी सुरक्षा यांचे क्रमांक आहेत. या समूहात महिला प्रवाशांना जोडण्यात येत आहे. महिलांना मदतीसाठी या समूहाच्या माध्यमातून संपर्क साधता येतो. त्याचवेळी रेल्वे सुरक्षा दलही या समूहाच्या मदतीने महिला प्रवाशांशी संपर्कात राहून त्यांना आवश्यक त्या सूचना देत आहे.


# पुनावळेकरांना दिलासा!

## अजित पवार यांचे आश्वासन : प्रस्तावित कचरा डेपोप्रकरणी आयुक्तांसोबत उद्या बैठक

### ग्रामस्थ, सोसायटीधारक आणि प्रशासनाशी चर्चा करुन काढणार तोडगा

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुनावळे येथील प्रस्तावित कचरा डेपोबाबत महापालिका आयुक्त शेखर सिंह आणि स्थानिक नागरिकांच्या शिष्टमंडळासोबत पुण्यात बैठक घेवून तोडगा काढला जाईल, असे आश्वासन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहे. त्यामुळे पुनावळेकरांना काहीसा दिलासा मिळाला आहे.**



समस्थ पुनावळे ग्रामस्थ आणि सोसायटी सभासद...

कचरा डेपो हटवा, पुनावळे वाचवा...

9881162464
9822219946.

प्रति,
मा. श्री. अजित दादा पवार.
उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य.

विषय : पुनावळेतील कचरा डेपो आरक्षण स्थलांतर करणेबाबत.

आदरणीय दादा,

पुनावळे गावाचा समावेश १९९९ मध्ये पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत करण्यात आला. अद्याप या गावातील पायाभूत सोयी-सुविधा सक्षम झालेल्या नाहीत. महापालिका विकास आराखड्यानुसार, या गावातील मोकळ्या जागेत कचरा डेपोचे आरक्षण आहे. परंतु, सभोवताली मोठ्या प्रमाणात गृहप्रकल्प निर्माण झाले असून, महाराष्ट्रासह देशातील कानाकोपऱ्यातून या भागात नागरिक वास्तव्यास आले आहेत.

गेल्या काही दिवसांपासून पुनावळेत कचरा डेपा सुरू करण्याबाबत प्रशासकीय हालचाली सुरू आहेत. त्यामुळे या भागातील सुमारे ७० हजार नागरिक चिंतेत आहेत. बांधकाम व्यावसायिकांनी गृहप्रकल्प बांधून पूर्ण केले आहेत आणि सदनिकाधारक नागरिकांनी कोणाकडे दाद मागावी असा प्रश्न उपस्थित झाला आहे. हिंजवडी आयटी पार्कला लागूनच हा डेपो निर्माण होणार असल्यामुळे आयटी आणि उच्चशिक्षित लोकांमध्ये प्रशासन आणि लोकप्रतिनिधींबाबत नाराजाचीचा सूर आहे.

वास्तविक, कचरा डेपो ही शहराची गरज आहे. त्यामुळे हा डेपो रद्द करावा, अशी मागणी व्यवहार्य नाही. परंतु, लोकहित लक्षात घेता सदर कचरा डेपोचे आरक्षण पर्यायी शासकीय जागेत करावे. ज्या ठिकाणी भविष्यत गृहप्रकल्प होणार नाहीत. तशी जागा आम्ही ग्रामस्थ प्रशासनाला सूचवण्याची तयारी ठेवली आहे.

अपणांस विनंती की, कचरा डेपो रद्द न करता कायदेशीर बाबींच्या आधारे कचरा डेपो आरक्षण स्थलांतर करण्याबाबत प्रशासनाचे व्यापक जनहिताच्या दृष्टीने निर्णय घ्यावा. तसेच, यासंदर्भात ग्रामस्थ, सोसायटीधारक आणि प्रशासन अशी बैठक घ्यावी. ज्यामध्ये स्थानिक नागरिकांच्या भावना प्रशासनाने जाणून घ्याव्त.

सकारात्मक प्रतिसादाची अपेक्षा!

धन्यवाद,

आपला स्नेहांकीत,





पुनावळे गावाचा समावेश १९९९ मध्ये पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत करण्यात आला. अद्याप या गावातील पायाभूत सोयी-सुविधा सक्षम झालेल्या नाहीत. महापालिका विकास आराखड्यानुसार, या गावातील मोकळ्या जागेत कचरा डेपोचे आरक्षण आहे. परंतु, सभोवताली मोठ्या प्रमाणात गृहप्रकल्प निर्माण झाले असून, महाराष्ट्रासह देशातील कानाकोपऱ्यातून या भागात नागरिक वास्तव्यास आले आहेत. त्यामुळे या डेपोला स्थानिक नागरिकांसह सोसायटीधारकांनी तीव्र विरोध केला आहे.

दरम्यान, स्थानिक नागरिकांनी "मी पुनावळेकर" ही मोहीम हाती घेतली असून, नुकतीच उपमुख्यमंत्री अजित पवार यांची मुंबईत भेट घेतली. यावेळी नागरिकांची बाजू मांडण्यात आली. तसेच, निवेदनही देण्यात आले. यावेळी पुनावळे ग्रामस्थ व सोसायटीधारक प्रतिनिधी उपस्थित होते. गेल्या काही दिवसांपासून पुनावळेत कचरा डेपा सुरू करण्याबाबत प्रशासकीय हालचाली सुरू आहेत. त्यामुळे या भागातील सुमारे ३० हजार नागरिक चिंतेत आहेत. बांधकाम व्यावसायिकांनी गृहप्रकल्प बांधून पूर्ण केले आहेत आणि सदनिकाधारक नागरिकांनी कोणाकडे दाद मागावी असा प्रश्न उपस्थित झाला आहे. हिंजवडी आयटी हबला लागूनच हा डेपो निर्माण होणार असल्यामुळे आयटी आणि उच्चशिक्षित लोकांमध्ये प्रशासन आणि लोकप्रतिनिधींबाबत नाराजाचीचा सूर आहे.

### आरक्षण स्थलांतर करा : ग्रामस्थांची मागणी

**वास्तविक, कचरा डेपो ही शहराची गरज आहे. त्यामुळे हा डेपो रद्द करावा, अशी मागणी व्यवहार्य नाही. परंतु, लोकहित लक्षात घेता सदर कचरा डेपोचे आरक्षण पर्यायी शासकीय जागेत करावे. ज्या ठिकाणी भविष्यत गृहप्रकल्प होणार नाहीत. तशी जागा आम्ही ग्रामस्थ प्रशासनाला सूचवण्याची तयारी ठेवली आहे. कचरा डेपो रद्द न करता कायदेशीर बाबींच्या आधारे कचरा डेपो आरक्षण स्थलांतर करण्याबाबत सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी घेतली आहे.**

**याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सकारात्मक भूमिका घेतली असून, उद्या शुक्रवारी पुणे येथे महापालिका आयुक्त शेखर सिंह आणि ग्रामस्थ व सोसायटीधारकांच्या शिष्टमंडळासोबत चर्चा करू आणि दोन्ही बाजू ऐकून तोडगा काढण्यात येईल, असे आश्वासन अजित पवार यांनी दिले आहे. त्यामुळे उद्या होणाऱ्या बैठकीकडे पुनावळेकरांचे लक्ष लागले आहे.**

---

# पिंपरी-चिंचवडमध्ये शुद्ध पाणी पुरवठा करा !

## दीपक मोढवे पाटील : महापालिका आयुक्त, अतिरिक्त आयुक्त यांना निवेदन

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांना शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्याबाबत महापालिका प्रशासनाने तात्काळ उपाययोजना कराव्यात. अशुद्ध पाण्यामुळे नागरी आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून, याबाबत गांभीर्याने कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे, अशी मागणी भाजपा वाहतूक आघाडीचे शहराध्यक्ष दीपक मोढवे-पाटील यांनी केली आहे.**





याबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील, विजय खोराटे आणि उल्हास जगताप यांना निवेदन पाठवले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, गेल्या अनेक दिवसांपासून पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांना गढूळ, अशुद्ध पाणी पुरवठा होत आहे. चिखली, डुडुळगाव, मोशी, जाधववाडी, आदींसह शहरातील विविध ठिकाणी ही समस्या जाणवत आहे. या बाबत नागरिक सातत्याने तक्रारी करत आहेत. मात्र त्यांच्या तक्रारींना महापालिका कर्मचारी सकारात्मक प्रतिसाद देत नाहीत. या बरोबरच शहरातील अनेक भागात रासायनिक कंपन्यांचे सांडपाणी प्रक्रिया न करता नदीत सोडले जात आहे. त्यामुळे नदी प्रदूषणात भर पडत आहे. नदीतील पाणी फेसाळलेले दिसत आहे. जलचर देखील मोठ्या प्रमाणात मृत्युमूखी पडत आहेत. या बरोबरच शहरातील मैलामिश्रित पाणी पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईनमध्ये घुसून नागरिकांना अशुद्ध पाणी मिळत आहे. यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

परिणामी, नागरिकांचे आरोग्य सदृढ करण्यासाठी यावर कायमस्वरूपी उपाययोजना करणे गरजेचे आहे. रासायनिक कंपन्या नदीत सांडपाणी सोडत असतील तर त्यांच्यावर कारवाई करणे गरजेचे आहे. कार्यवाहीच्या सूचना द्याव्यात. शहरातील पिण्याच्या पाईपलाईनजवळून मैलामिश्रित पाणी जाणार नाही. स्वतंत्र पाईपलाइनची सुविधा द्यावी, अशी मागणी दीपक मोढवे-पाटील यांनी केली .

### पाणी समस्येमुळे नागरिक त्रस्त...

सारथी हेल्पलाईनवर पाणीपुरवठ्याबाबत तक्रारी मांडूनही नागरिकांच्या समस्या सुटलेल्या नाहीत. त्यामुळे हेल्पलाइनचा खेळ करण्याऐवजी प्रत्यक्ष यंत्रणा सक्षम करून नागरिकांना शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करावा. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने क्षेत्रीय कार्यालयाच्या स्तरावर जनसंवाद सभा आयोजित केल्या जात आहेत. या मध्ये नागरिक आपल्या समस्यांचे गाऱ्हाणे मांडत आहेत. यंदा बहुतांश भागातून पाण्याबाबत तक्रारी आलेल्या आहेत. अनेक भागात अपुरा आणि कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे. नागरिकांना पुरेसे पाणी मिळत नाही. त्यामुळे नोकरदारांची, गृहणीची गैरसोय होत आहे. अनेक सोसायटीधारकांना खिशातील पैसे खर्च करून पाण्याचा टँकर मागविण्याची वेळ येत आहे. यामुळे शहरातील नागरिक त्रस्त आहेत. त्यामुळे ज्या भागात कमी दाबाने पुरवठा होत आहे, तिथे देखील योग्य उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही दीपक मोढवे-पाटील यांनी केली आहे.




# राज्ययंत्रणेने गुंडासारखे वागू नये!

**आधी 'एन्काउंटर-न्याय', त्या चकमकींमधून लोकप्रियत मिळते हे दिसल्यावर 'बुलडोझर-न्याय' आणि आता हरियाणासारख्या राज्यात हिंसाचाराचा ठपका ठेवून एक वस्ती उद्ध्वस्त केली जाणे... या साऱ्याला कोणत्या कायद्याचा आधार आहे? नसेल, तर मग या गुंडगिरीला लोकप्रियता कशी काय मिळते आहे?**

हरियाणात- दिल्लीनजीकच्या गुरुग्राम आणि नूह शहरांत सुरू झालेला हिंसाचार आता शमला असला तरी महत्त्वाची गोष्ट अशी की, 'न्यायदाना'साठी इथे बुलडोझरचा वापर करण्यात आला. नूहच्या ज्या रस्त्यावरून विश्व हिंदू परिषदेने मिरवणूक काढल्यानंतर हा हिंसाचार सुरू झाला होता त्याच रस्त्यावरील सारी घरे, दुकाने, हॉटेले- उपाहारगृहे आता जमीनदोस्त करण्यात आलेली आहेत. या 'बुलडोझर-न्यायदाना'त पंजाब व हरियाणा उच्च न्यायालयाने हस्तक्षेप केला, तोवर राज्य सरकारने पन्नासेक इमारती भुईसपाट केल्या होत्या. ही 'बुलडोझर न्याया'ची कल्पना मुळात योगी आदित्यनाथ यांची. या आदित्यनाथांची मुस्लिमांना खुले आव्हान देणारी प्रतिमा उत्तर प्रदेशसारख्या राज्याचे मुख्यमंत्रीपद मिळाल्यानंतर जरा मवाळ झाली असली, तरी याच पदावर आल्याआल्या त्यांनी गुन्हेगारांना रोखण्यासाठी 'एन्काउंटर न्याया'चा



मार्ग अवलंबला. गरिबीमुळे तरुण गुन्हेगारीकडे वळतात आणि राज्यातील अनेक गुन्हेगार मुस्लिम समाजातील गरीब आहेत, हे ओळखून एका दगडात दोन पक्षी मारण्याचा हा मार्ग ठरला. कुख्यात गुन्हेगारांशी चकमकींचे हे काम त्यांच्या विश्वासू पोलिस दलाला देण्यात आले, 'हे योगींचे निर्देश आहेत' याची पुरेशी प्रसिद्धी करण्यात आली, यामुळे उत्तर प्रदेशासारख्या राज्यात योगी लोकप्रिय झाले. अर्थात, डझनभर पोलिसांना ठार करण्याचा आरोप असलेला कुख्यात गुंड जरी 'दुबे' असला तरी त्याच्यावर पोलिस दलाने गोळ्या झाडल्या, यातून उत्तर प्रदेशात टोकाच्या परिस्थितीत तरी धार्मिक भेदभाव केला जात नसल्याचे दिसून आले होते. यापुढले पाऊल म्हणजे, योगींनी सार्वजनिक मालमत्तेची नासधूस करणाऱ्या दंगलखोरांना नेस्तनाबूत करण्याची घोषणा केली. 'बुलडोझर' हे शिक्षेचे प्रतीक बनले. सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केल्याचा संशय ज्यांच्यावर होता त्यांची घरे पाडली गेली.

चकमकीतील हत्या पोलिसांनी 'स्वसंरक्षणार्थ' केल्या, असे कायदेशीर स्पष्टीकरण तरी देता येत होते... पण बुलडोझर वापरात आणला तेव्हा ही सबब उपलब्ध नसल्यामुळे नगरपालिका अथवा सरकारी यंत्रणांमार्फत, 'ही बांधकामे बेकायदा आहेत' किंवा किमानपक्षी अ-नियमित आहेत, हे कारण 'बुलडोझर-न्याया'साठी पुढे करण्यात आले. हा असाच 'बुलडोझर न्याय' जेव्हा हरियाणातील नूहमध्ये वापरला गेला तेव्हा पंजाब व हरियाणा उच्च न्यायालयाच्या विभागीय खंडपीठाने स्वत:हून दखल घेतली. या पाडकामांना खंडपीठाने तात्काळ स्थगिती दिली आणि झालेल्या कारवाईचा निषेधही केला. नष्ट करण्यात आलेली सर्व मालमत्ता फक्त एका (मुस्लीम) समुदायाची होती, हे नमूद करून खंडपीठाने 'सरकारचा हेतू अधिक भयंकर आहे की काय?' असा सवाल केला. बांधकाम पाडण्यापूर्वी स्वतःचे नियम न पाळल्याबद्दलही त्यांनी सरकारवर ताशेरे ओढले. यापैकी अगदी मूलभूत नियम म्हणजे बांधकाम का पाडावे लागेल याची लेखी सूचना देणे. हे सरकारी यंत्रणांनी केले नाही. विहिंपने नूह शहराच्या मुस्लीमबहुल भागातून 'धार्मिक मिरवणूक' काढल्यानंतरच नूहमध्ये दंगल सुरू झाली. यामागचा हेतू अर्थातच अल्पसंख्याक समाजाला चिथावणी देण्याचा होता आणि तो साध्य झाला. अशी मिरवणूक त्या विशिष्ट मार्गाने यापूर्वी काढण्यात आली होती का? मग आताच या मार्गाला परवानगी का देण्यात आली? गुरांची नेआण करणाऱ्या दोघा मुस्लीम तरुणांच्या हत्या प्रकरणी हवा असलेला 'गोरक्षक' आणि बजरंग दलाचा स्थानिक पुढारी मोहित यादव ऊर्फ मोनू मानेसर हा 'या मिरवणुकीत हिंदूंनी मोठ्या संख्येने सामील व्हावे' असे आवाहन करत असल्याचे ध्वनिचित्रमुद्रण प्रसारित करण्याची परवानगी का देण्यात आली? नूहला व्यापणाऱ्या या दंगलीचे लोण 'व्यावसायिक केंद्र' म्हणून प्रसिद्ध असलेल्या गुरुग्राममध्येही पसरले होते. या गुरुग्राममध्ये अनेक मोठया कॉर्पोरेट कंपन्यांची कार्यालये आहेत. याही भागात २०२४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी धर्मभेदमूलक उन्माद फैलावण्याचा संघटित प्रयत्न होतो आहे, हे यातून दिसले.

## संपादकीय »

### चंद्रमाधवीच्या प्रदेशात

***अपयशांतून शिकत प्रयोग करत राहणे यावर(च) असलेल्या विज्ञानविश्वाच्या विश्वासाचे फळ आज चंद्रावर अलगदपणे उतरलेल्या भारतीय यानाच्या रूपाने आपणास मिळाले..***

'हायड्रोजनचे दोन रेणू आणि ऑक्सिजनचा एक कोणत्याही कुमुहूर्तावर एकत्र आले तरी त्यातून पाणी होणारच"; अशा अर्थाचे विधान सावरकर करतात. याचा अर्थ शास्त्रकाटय़ाच्या कसोटीवर, शास्त्रीय नियमांच्या आधारे एखादी गोष्ट केली जात असेल तर तिच्या यशासाठी मुहूर्त, अभिषेक, अनुष्ठाने इतकेच काय पण आशीर्वादाचीही गरज नसते. भारतीय अवकाश संशोधन संस्थेच्या तिसऱ्या 'चंद्रयान' मोहिमेचे यश हे या शुद्ध शास्त्रीय बाण्यात दडलेले आहे. या देदीप्यमान यशासाठी विज्ञानावर निष्ठा असलेल्या आणि त्यानुसार मार्गक्रमण करणाऱ्या सर्व शास्त्रज्ञ, अभियंते, तंत्रज्ञ यांचे मन:पूर्वक अभिनंदन. देशाने अवकाश विज्ञानाच्या क्षेत्रात इतकी उंच भरारी घ्यावी ही यानाचा वेग फक्त १० किमी प्रति तास इतका कमी करणे आणि आडवे धावणाऱ्यास अचानक उभे करून पृष्ठभागावर उतरवणे हे कल्पनाही करता येणार नाही इतके प्रचंड आव्हान इस्रोच्या वैज्ञानिकांनी यशस्वीपणे पेलले.

**सर्वच क्षेत्रांत देशाचे नेतृत्व करणारा महाराष्ट्र दुर्दैवाने शेतकरी आत्महत्यांमध्येही आघाडीवर आहे. राज्यावरील हा कलंक पुसून टाकण्यासाठी गरज आहे, वर्षभरात एकच पीक घेणाऱ्या शेतकऱ्याला शाश्वत सिंचनाची सोय उपलब्ध करून देण्याची. राज्यातील ४० हजारांहून अधिक पाझर तलावांचा शास्त्रशुद्ध पद्धतीने विकास केल्यास हे सहज शक्य आहे.**

# पाझर तलाव थांबविणार शेतकरी आत्महत्या!

आपल्या देशाच्या नियोजनाचे इंजिन असलेल्या 'नीती आयोगाने' देशातील पाण्याच्या स्थितीबद्दल नोंदविलेले मत जलक्षेत्राच्या अवस्थेबद्दल खूप काही सांगून जाते. नीती आयोगाने म्हटले आहे, देशातील ६०० दशलक्ष लोकसंख्या पाण्याचे उच्च ते अती उच्च (हाय टू एक्स्ट्रीम) दुर्भिक्ष अनुभवत आहे. एकूण निर्मित पृष्ठीय जलसाठ्यांपैकी उपलब्ध ४० टक्के साठे पिण्याच्या पाण्यासाठी खर्च होत आहेत. देशांतर्गत प्रतिवर्ष स्वच्छ पाण्याच्या उप्लब्धतेअभावी दोन लाख लोकांचा मृत्यू होतो. सन २०५० मध्ये पाण्याची मागणी ही पुरवठ्यापेक्षा जास्त होणार असल्याने व्यवस्थित नियोजन न झाल्यास ही स्थिती हाताबाहेर जाणार आहे, असा सुस्पष्ट उल्लेख १४ जून २०१८ साली प्रकाशित झालेल्या कम्पोझिट वॉटर मॅनेजमेंट इंडेक्स रिपोर्टमध्ये करण्यात आला आहे. या अहवालानंतरच केंद्र सरकारने जलशक्ती अभियान हाती घेतले आहे.



राज्याच्या बाबतीत बोलायचे झाले तर जलयुक्त शिवार, या पथदर्शी योजनेचा चांगला फायदा झाला आहे. पिण्याच्या पाण्यासह संरक्षित सिंचनाखालील क्षेत्रात वाढ झाली आहे. त्याचा फायदा कृषी क्षेत्रालाही झाला आहे. कृषी उत्पन्न वाढविण्यासाठी सिंचन/संरक्षित सिंचन, हा मूलभूत असा महत्त्वाचा घटक आहे. राज्यातील जवळजवळ ७० टक्क्यांहून अधिक क्षेत्रातील शेतकरी कोरडवाहू असून, सर्व प्रकारे होणारे सिंचन मात्र ३० टक्क्यांच्या खालीच आहे. या कोरडवाहू शेतकऱ्यांत पुन्हा वर्गवारी होते, ती एक पीक घेणारा आणि दोन पिके घेणारा. एक पीक घेणारा शेतकरी आत्महत्याप्रवण शेतकरी आहे. आजवर झालेल्या आत्महत्यांमध्ये त्यांचेच प्रमाण जास्त असल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे या शेतकऱ्यांचा प्राधान्याने विचार होणे गरजेचे आहे. त्या नंतर प्रकल्पाखालील सिंचन कसे अधिकाधिक करता येईल याचा स्वतंत्र विचार करू. एकपिकाखालील शेतकऱ्याला प्रभावी संरक्षित सिंचन उपलब्ध करून देणारी रोजगार हमी योजना ही महाराष्ट्र राज्याची देशाला देणगी आहे, या योजनेच्या माध्यमातून प्रचंड प्रमाणात पाझर तलावांची निर्मिती झाली. दुष्काळ अगर टंचाईच्या काळात एकीकडे जनतेस जगण्याचे साधन तर दुसरीकडे सिंचनाची सोय करणे अशा दुहेरी उद्देशाने तलावांची निर्मिती झाली. राज्यात आजमितीस ४० हजारहून जास्त पाझर तलावांची कामे पूर्ण झालेली आहेत. पुढे अशा तलावांचा शेतकऱ्याला नेमका किती लाभ होतो यासाठी अभ्यास झाले. पुणे येथील 'पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय' यांनीही तब्बल १० वर्षे क्षेत्रीय अभ्यास केला.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# यंदा शेतकऱ्यांसाठी साखर कडू होणार?

## » 7 वर्षांनंतर साखरेच्या निर्यातीवर बंदी येण्याची शक्यता

। वाळवा । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**केंद्र सरकारने वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर 2016 नंतर प्रथमच साखर निर्यातीवर बंदी घालण्याचे संकेत दिलेत. असे झाले तर कांद्यानंतर साखरेच्या मुद्यावरून ऐन सनासुदीच्या काळात महाराष्ट्राचे राजकारण पेटण्याची शक्यता आहे. पुढील वर्षी देशात सार्वत्रिक व विधानसभा निवडणुकांचा फड रंगणार आहे.**

या पार्श्वभूमीवर केंद्रातील नरेंद्र मोदी सरकार दर नियंत्रणासाठी लागोपाठ पाऊले टाकत आहे. रॉयटर्सच्या वृत्तानुसार, सरकार साखरेच्या मुद्यावर लवकच निर्यातबंदीचा निर्णय घेण्याच्या विचारात आहे.यंदा महाराष्ट्रात कमी पाऊसमान झाले आहे. पावसाने ओढ दिल्यामुळे साखरेच्या उत्पादनात मोठी घट होऊ शकते. या पार्श्वभूमीवर देशांतर्गत बाजारपेठेतील साखरेचे दर स्थिर रहावेत यासाठी केंद्र साखर निर्यातबंदीचा निर्णय घेऊ शकते, असे यासंबंधीच्या वृत्तात नमूद करण्यात आले आहे.

देशात महाराष्ट्र, कर्नाटक, उत्तर प्रदेश या राज्यांत साखरेचे मुबलक उत्पादन होते. यापैकी उत्तर प्रदेशात यंदा चांगला पाऊस झाला. पण महाराष्ट्रात कमी पाऊसमान झाल्यामुळे त्याचा फटका साखर उत्पादनाला बसण्याची भीती आहे

.जुलै महिन्यात महागाईचा



### यंदा साखरेचे उत्पादन घसरणार

» यंदा दरवर्षीच्या तुलनेत किमान 3.5 टक्के म्हणजे तब्बल 10 लाख टन साखरेचे कमी उत्पादन होण्याची शक्यता आहे. यामुळे देशांतर्गत बाजारपेठेत आताच साखरेच्या दरात मोठी वाढ झाली आहे. केंद्राने यापूर्वी साखर कारखान्यांना 61 लाख टनांपर्यंत साखर निर्यातीची परवानगी दिली होती. पण यावेळी ती दिली जाण्याची शक्यता नाही.

निर्देशांक 7.44 टक्क्यांवर पोहचला. गत 15 महिन्यांतील महागाई निर्देशांकाची ही सर्वात मोठी वाढ होती.

टोमॅटोच्या दरानेही शंभरी गाठली आहे. त्यानंतर सरकारने कांद्यावर 40 टक्के निर्यात शुल्क लादले. आता साखरेवरही किमान 3 महिन्यांसाठी निर्यातबंदी लागू केली जाऊ शकते, अशी सरकार दरबारी चर्चा आहे. विशेष म्हणजे लोकसभा निवडणूक अवघ्या काही महिन्यांवर येऊन ठेपली आहे. चालू वर्षाच्या अखेरीस मध्य प्रदेश व राजस्थान या 2 प्रमुख राज्यांसह 5 राज्यांत विधानसभा निवडणुकीचा फड रंगणार आहे.

त्यामुळे केंद्र सरकार जीवनावश्यक वस्तुंच्या दरवाढीवर डोळ्यात तेल घालून नजर ठेवत आहे.यंदा दरवर्षीच्या तुलनेत किमान 3.5 टक्के म्हणजे तब्बल 10 लाख टन साखरेचे कमी उत्पादन होण्याची शक्यता आहे. यामुळे देशांतर्गत बाजारपेठेत आताच साखरेच्या दरात मोठी वाढ झाली आहे. केंद्राने यापूर्वी साखर कारखान्यांना 61 लाख टनांपर्यंत साखर निर्यातीची परवानगी दिली होती. पण यावेळी ती दिली जाण्याची शक्यता नाही.

ऊस हे कांद्यासारखेच राजकीयदृष्ट्या संवेदनशील पीक आहे. महाराष्ट्रात अनेक राजकीय नेत्यांचे भवितव्य साखर कारखानदारीवर अवलंबून आहे. भाववाढीचा फटका ग्राहकांना बसू नये तसेच शेतकऱ्यांनाही ऊसाचा चांगला भाव मिळणे गरजेचे आहे.

त्यामुळे सरकार साखरेवर अंशतः निर्यातबंदी लादून दर नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न करत आहे.केंद्राने साखरेवर निर्यातबंदी लागू करण्याचा निर्णय घेतला, तर मागील 7 वर्षांत प्रथमच असे घडेल. 2016 मध्ये केंद्राने साखरेवर 20 टक्के निर्यातशुल्क लागू केले होते. गत 2 वर्षांत भारताने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत प्रचंड साखर निर्यात केली आहे. पण आता आगामी निवडणुका व पावसाने ओढ दिल्यामुळे सरकार सावधपणे पाऊले टाकताना दिसत आहे.

# राज्यातील अनेक जिल्हे तहानलेले!

## » राज्यात दुष्काळ जाहीर करा : सुप्रिया सुळे

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी ट्वीट केलं आहे. महाराष्ट्र शासनाने राज्यात दुष्काळ जाहिर करुन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, तसेच परीस्थितीचा तातडीने आढावा घ्यावा अशी मागणी सुप्रिया सुळेंनी केलीय.राज्यात सध्या पावसाने दडी मारली आहे. शेतकऱ्यांच्या पिकांना पावसाची गरज असताना पाऊस पडताना दिसत नाही. हातची पीकं वाया जाण्याचा धोका निर्माण झालाय. त्यामुळं शेतकरी चिंतेत आहेत.**



### शेतकऱ्यांना निधी द्या !

» सुप्रिया सुळेंनी राज्यातील पावासाच्या स्थितीबाबत ट्वीट केलं आहे. यामध्ये त्यांनी राज्यात दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली आहे. राज्यात पावसानं दडी मारल्यानं बळीराजा चिंतेत आहे. राज्यातील अनेक जिल्ह्या सरासरीपेक्षा कमी पावसाची नोंद झाली आहे. मराठवाड्यासह पश्चिम महाराष्ट्रातील अने जिल्हे तहानलेलेच आहेत. विदर्भातील काही जिल्हे आमि कोकणात काही प्रमाणात पावसानं हजेरी लावली आहे. मात्र, अन्य भागात पावसानं दडी मारल्याचं चित्र दिसत आहेत. त्यामुळं हातची पीकं वाया जाण्याची भीती निर्माण झालीय. त्यामुळं राज्यात पाणी टंचाईचं संकट येण्याची शक्यता देखील वर्तवण्यात आली आहे.

जून महिना कोरडा गेल्यानंतर जुलैमध्ये काही प्रमाणात पाऊस झाला. मात्र, पुन्हा ऑगस्ट महिना संपत आला तरी म्हणावा तसा पाऊस झाला नाही.सुप्रिया सुळेंनी राज्यातील पावासाच्या स्थितीबाबत ट्वीट केलं आहे. यामध्ये त्यांनी राज्यात दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली आहे. राज्यात पावसानं दडी मारल्यानं बळीराजा चिंतेत आहे. राज्यातील अनेक जिल्ह्या सरासरीपेक्षा कमी पावसाची नोंद झाली आहे. मराठवाड्यासह पश्चिम महाराष्ट्रातील अने जिल्हे तहानलेलेच आहेत. विदर्भातील काही जिल्हे आमि कोकणात काही प्रमाणात पावसानं हजेरी लावली आहे. मात्र, अन्य भागात पावसानं दडी मारल्याचं चित्र दिसत आहेत. त्यामुळं हातची पीकं वाया जाण्याची भीती निर्माण झालीय. त्यामुळं राज्यात पाणी टंचाईचं संकट येण्याची शक्यता देखील वर्तवण्यात आली आहे.महाराष्ट्रात जुन, जुलै या महिन्यात अपेक्षित पाऊस झालेला नाही. त्यातच या ऑगस्ट महिन्यात देखील सरासरीपेक्षा सुमारे 68 टक्क्यांनी पाऊस कमी झाला आहे. राज्यात 1 ते 18 ऑगस्ट दरम्यान सर्वच विभागांत पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा 80 टक्क्यांनी कमी आहे. बहुतेक ठिकाणी पाऊस पडलेला नाही. ही परिस्थिती भीषण असल्याचे सुप्रिया सुळे यांनी आपल्या ट्वीटमध्ये म्हटलंय. परीस्थितीचा तातडीने आढावा घ्यावा असे त्या म्हणाल्या. तसेच पिण्याच्या पाण्याचे टँकर, जनावरांसाठी चारा छावण्या आणि इतर दुष्काळाची कामे हाती घेण्यासंदर्भात तातडीने सकारात्मक विचार करुन अंमलबजावणी करावी.

# किशोरी पेडणेकरांना अटकेपासून दिलासा

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

माजी महापौर किशोरी पेडणेकर यांच्यावर कोरोना काळातील भ्रष्टाचाराचे आरोप आहेत. कोरोना काळात बॉडी बॅग प्रकरणात किशोरी पेडणेकर यांनी 50 लाखांचा घोटाळा केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. ईडीने किशोरी पेडणेकर यांच्यावर गुन्हा दाखल केला होता. त्यातच आता किशोरी पेडणेकर यांना 29 ऑग. अटकेपासुन दिलासा मिळाला आहे. मुंबईच्या माजी महापौर तथा ठाकरे गटाच्या महिला नेत्या किशोरी पेडणेकर यांच्या विरोधात ईडीकडून गुन्हा दाखल करण्यात आला. कोविड काळात बॉडी बॅग खरेदीत घोटाळा केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. तर याचप्रकरणात आर्थिक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी पेडणेकर यांच्यासह मुंबई महापालिकेच्या दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला होता.कोरोना काळात मुंबई महापालिकेने काढलेल्या काही टेंडरमध्ये कोट्यवधींचा घोटाळा झाला. त्यात किशोरी पेडणेकर यांचा हात आहे, असा आरोप अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) केला आहे. यासंबंधीच्या वृत्तानुसार, या प्रकरणी मृत कोविड रुग्णांना वाहून नेण्यासाठी वापरण्यात येणारी बॉडी बॅग 2 हजारांऐवजी 6800 रुपयांना खरेदी करण्यात आली होती.या कालावधीत मुंबईच्या महापौरपदी किशोरी पेडणेकर होत्या. वादग्रस्त कंत्राट त्यांच्याच इशाऱ्यानुसार देण्यात आल्याचे ईडीने म्हटले आहे. या प्रकरणी तपास संस्थेने गत 21 जून रोजी राज्यभरात छापेमारी केली होती. त्यात 68 लाख 65 हजार रुपयांची रोकड, 150 कोटींची स्थावर मालमत्ता सील करण्यात आली होती. याशिवाय 15 कोटींची एफडी व अन्य गुंतवणूकही या प्रकरणी हाती लागली होती. उद्धव ठाकरे यांचे निकटवर्तीय सूरज चव्हाण व सुजीत पाटकर यांच्यासह 10 ते 15 जणांविरोधात ही कारवाई करण्यात आली होती.

# चांद्रयान-3 साठी ब्रिक्समध्ये पंतप्रधान मोदींचे अभिनंदन!

## मोदींनी ब्रिक्सच्या नवीन सदस्यांचे केले स्वागत

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दक्षिण आफ्रिकेतील 15व्या ब्रिक्स परिषदेच्या शेवटच्या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग हे हस्तांदोलन करताना दिसले. पत्रकार परिषद सुरू होण्यापूर्वी दोन्ही नेत्यांमध्ये काही सेकंद चर्चा झाली. यापूर्वी नोव्हेंबर 2022 मध्ये पंतप्रधान मोदी आणि शी जिनपिंग यांनी इंडोनेशियामध्ये झालेल्या शिखर परिषदेत सीमा वादावर चर्चा केली होती, ज्याची माहिती या वर्षी देण्यात आली होती.**

दुसरीकडे 6 नवीन देशांना ब्रिक्स संघटनेत सहभागी होण्यासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. यामध्ये अर्जेंटिना, सौदी अरेबिया, यूएई, इजिप्त, इथिओपिया आणि इराण यांचा समावेश आहे. ते 1 जानेवारी 2024 पासून ब्रिक्सचे स्थायी सदस्य होतील. दक्षिण आफ्रिकेचे अध्यक्ष सिरिल रामाफोसा यांनी सांगितले की, पहिल्या टप्प्यातील बैठकीत या देशांना संघटनेचे सदस्य होण्यासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. तसेच, दक्षिण आफ्रिकेमध्ये स्वाक्षरी केलेल्या च्या घोषणेमध्ये, मध्ये ब्राझील, भारत आणि दक्षिण आफ्रिकेच्या स्थायी सदस्यत्वाची मागणी करण्यात आली होती. याशिवाय पत्रकार परिषदेनंतर मोदींनी इथिओपियासोबत द्विपक्षीय बैठकही घेतली.ब्रिक्ससाठी आमंत्रित करण्यात आलेल्या देशांचे पंतप्रधान मोदींनी अभिनंदन केले.

ते म्हणाले- भारताने ब्रिक्समधील विस्ताराला नेहमीच पाठिंबा दिला आहे. या सर्व देशांशी आपले खोल आणि ऐतिहासिक संबंध आहेत. मला आनंद आहे की, 3 दिवसीय बैठकीत अनेक सकारात्मक परिणाम दिसून आले आहेत. पाश्चिमात्य देशांचे वर्चस्व असलेल्या संघटनांचे नाव न घेता पीएम मोदी म्हणाले - ब्रिक्सचा विस्तार हे दर्शविते की, जगातील मोठ्या संघटना काळाबरोबर बदलल्या पाहिजेत. त्याचबरोबर जे देश पहिल्या टप्प्यात या संघटनेत सामील होऊ शकले नाहीत त्यांना या संघटनेचे सदस्यत्व मिळवून देण्यासाठी भारत आपले योगदान देईल.चीनचे राष्ट्राध्यक्ष जिनपिंग म्हणाले - ब्रिक्समधील सर्व देशांना खूप महत्त्व आहे. संस्थेत नवीन सभासदांचा सहभाग ऐतिहासिक आहे. ब्रिक्ससाठी ही एक नवीन सुरुवात आहे.

आमच्या संस्थेचे भविष्य उज्ज्वल आहे. मला खात्री आहे की जोपर्यंत आपण एका उद्देशाने पुढे जाऊ, तोपर्यंत आपण अधिक चांगले करू शकू.सिरिल रामाफोसा यांनी सांगितले की, डॉलरला आव्हान देण्यासाठी संस्थेच्या करन्सीला रिझर्व्ह बँक आणि सर्व देशांच्या अर्थमंत्र्यांशी बोलण्यास सांगितले होते. पुढील वर्षी यावर चर्चा होईल. संघटनेच्या सदस्यांनी वाटाघाटीनंतर विविध मुद्द्यांवर जोहान्सबर्ग जाहीरनामा स्वीकारला आहे. रामाफोसा म्हणाले- आम्ही ब्रिक्सच्या स्थापनेला 10 वर्षे पूर्ण झाल्याचा आनंद साजरा केला आहे. ग्लोबल साउथच्या समस्यांवर आम्ही चर्चा केली.

जगात सुरू असलेल्या विविध संघर्षांवर चर्चा केली. सर्व वाद संवादातून सोडवण्याचा आमचा आग्रह आहे. त्याचवेळी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी ब्रिक्ससाठी समान करन्सी असण्याविषयी प्रतिपादन केले आहे.तत्पूर्वी, चांद्रयान-3 च्या यशस्वी लँडिंगनंतर, ब्रिक्समधील डिनरच्या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अभिनंदन करणाऱ्या नेत्यांची गर्दी झाली होती. बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना, दक्षिण आफ्रिकेचे अध्यक्ष सिरिल रामाफोसा आणि रशियाचे परराष्ट्र मंत्री सर्गेई लावरोव्ह यांनी मोदींचे हार्दिक स्वागत केले.



### ब्रिक्स भारतासाठी महत्त्वाचे का?

भारताचे परराष्ट्र धोरण जगातील कोणत्याही एका देशाच्या वर्चस्वाच्या विरोधात आहे. भारत बहुध्रुवीय जगाचे समर्थन करतो. अशा परिस्थितीत ब्रिक्स भारतासाठी आवश्यक आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे आपल्या व्यासपीठावरून भारत पाश्चिमात्य देशांच्या वर्चस्वाविरुद्ध उघडपणे बोलू शकतो आणि त्याला इतर सदस्य देशांचा पाठिंबा मिळतो. या संघटनेत सामील होऊन भारताने WTO, जागतिक बँक आणि IMF सारख्या अनेक मोठ्या संस्थांमध्ये विकसित देशांच्या वर्चस्वाला खुले आव्हान दिले आहे.

# सर्व नोकरदार महिलांना मातृत्व रजेचा हक्क!

## नोकरी कायमस्वरूपी असो वा कंत्राटी, फरक पडत नाही : हायकोर्ट

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्ली उच्च न्यायालयाने गुरुवारी सांगितले की, सर्व गर्भवती महिलांना मातृत्व लाभ मिळण्याचा हक्क आहे. त्यांनी कायमस्वरूपी किंवा कंत्राटी पद्धतीने काम केले तरी फरक पडत नाही. त्यांना मातृत्व लाभ कायदा 2017 अंतर्गत दिलासा नाकारता येणार नाही.**

न्यायमूर्ती चंद्र धारी सिंह यांच्या खंडपीठाने दिल्ली राज्य विधी सेवा प्राधिकरण सोबत करारावर काम करणाऱ्या गर्भवती महिलेला दिलासा देताना ही निरीक्षणे नोंदवली. वास्तविक, कंपनीने महिलेला मातृत्व लाभ देण्यास नकार दिला. कंपनीने म्हटले आहे की, कंत्राटी कर्मचाऱ्याला मातृत्व लाभ देण्यासाठी विधी सेवा प्राधिकरणामध्ये कोणतेही कलम (तरतुदी) नाही. याचिकाकर्त्यांच्या वतीने वकील चारू वली खन्ना न्यायालयात हजर झाले. तर डीएसएलएसएच्या वतीने अधिवक्ता सरफराज खान यांनी युक्तिवाद केला. कोर्टाने या प्रकरणावर सुनावणी करताना म्हटले आहे की, मातृत्व लाभ कायद्यातील तरतुदींमध्ये असे काहीही नाही, ज्यामध्ये असे म्हटले आहे की नोकरी करणाऱ्या महिलेला गर्भधारणेदरम्यान दिलासा देण्यापासून रोखले जाईल. मातृत्व लाभ हा कंपनी आणि कर्मचारी यांच्यातील कराराचा भाग नाही. कुटुंब सुरू करण्याची आणि मुलाला जन्म देण्याची निवड करणाऱ्या महिलेची ओळख मिळणे हा मूलभूत अधिकार आहे.

न्यायमूर्ती सिंह म्हणाले की, आजच्या युगातही जर एखाद्या महिलेला तिचे कौटुंबिक जीवन आणि करिअरमधील वाढ यापैकी एक निवडायचे म्हटले तर समाज म्हणून आपण अपयशी ठरू. मूल जन्माला घालण्याचे स्वातंत्र्य हा स्त्रीचा मूलभूत अधिकार आहे, जो देशाच्या संविधानाने कलम 21 अन्वये नागरिकांना दिला आहे. कोणत्याही संस्था व संस्थेने या अधिकाराच्या वापरात अडथळे आणणे हे भारतीय राज्यघटनेने दिलेल्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन तर आहेच, पण सामाजिक न्यायाच्या मूलभूत तत्त्वांच्या विरुद्धही आहे.



### हा मूलभूत अधिकार

कोर्टाने या प्रकरणावर सुनावणी करताना म्हटले आहे की, मातृत्व लाभ कायद्यातील तरतुदींमध्ये असे काहीही नाही, ज्यामध्ये असे म्हटले आहे की नोकरी करणाऱ्या महिलेला गर्भधारणेदरम्यान दिलासा देण्यापासून रोखले जाईल. मातृत्व लाभ हा कंपनी आणि कर्मचारी यांच्यातील कराराचा भाग नाही. कुटुंब सुरू करण्याची आणि मुलाला जन्म देण्याची निवड करणाऱ्या महिलेची ओळख मिळणे हा मूलभूत अधिकार आहे.

## अल्लू अर्जुन -क्रिती बेस्ट ॲक्टर

69 व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांच्या विजेत्यांची घोषणा गुरुवारी सायंकाळी 5 वाजता करण्यात आली. मराठामोळा दिग्दर्शक निखिल महाजनला गोदावरी या चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा पुरस्कार मिळाला आहे. तर अल्लू अर्जुनला पुष्पा या चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार मिळाला, तर आलिया भट्ट आणि क्रिती सेनन यांना अनुक्रमे गंगूबाई काठियावाडी आणि मिमी या चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार विभागून मिळाला. रॉकेट्री: द नंबी इफेक्टला सर्वोत्कृष्ट फीचर फिल्मचा पुरस्कार मिळाला. सरदार उधम हा सर्वोत्कृष्ट हिंदी चित्रपट ठरला आहे, तर एकदा काय झाले हा सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट ठरला आहे. अभिनेत्री पल्लवी जोशीला द काश्मीर फाइल्ससाठी तर पंकज त्रिपाठीला मिमीसाठी सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्याचा पुरस्कार मिळाला आहे.राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार हे सर्वात प्रतिष्ठित पुरस्कार आहेत, जे देशभरातील सर्वोत्कृष्ट चित्रपट निर्मिती प्रतिभेचा सन्मान करण्यासाठी दरवर्षी जाहीर केले जातात. हे पुरस्कार पहिल्यांदा 1954 मध्ये देण्यात आले आणि ते 'स्टेट पुरस्कार' म्हणून ओळखले जायचे. त्यावेळी विविध प्रादेशिक भाषांमधील सर्वोत्कृष्ट चित्रपटांनाच मान्यता आणि पुरस्कार दिले जात होते. चित्रपटांवर काम करणारे अभिनेते आणि तंत्रज्ञ यांना प्रथम पुरस्कार 1967 मध्ये देण्यात आला. नर्गिस ही 'रात और दिन' मधील अभिनयासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्री जिंकणारी पहिली अभिनेत्री होती.




# करणचा उत्साह पाहून घाबरली कंगना!

करण जोहरने नुकतेच कंगना रनोटच्या आगामी 'इमर्जन्सी' चित्रपटाबद्दल मत व्यक्त केले. एका इव्हेंटमध्ये करणने म्हटले होते की, तो चित्रपट पाहण्यासाठी उत्सुक आहे. आता करणच्या या कमेंटवर कंगना रनोटने प्रतिक्रिया दिली आहे. ती म्हणाली की करणला चित्रपटासाठी उत्सुकता असल्याचे पाहून तिला भिती वाटली. करण जोहरच्या या विधानाशी संबंधित लिंक सोशल मीडियावर शेअर करताना चित्रपट वितरक राज बन्सल यांनी प्रश्न उपस्थित केला होता. बन्सल यांनी लिहिले, 'खरंच? करणने आपला विचार बदलला आहे का? या ट्विटला उत्तर देताना कंगनाने ट्विट केले आहे. कंगनाने लिहिले, 'हा.. हा.. मागच्या वेळी जेव्हा त्याने माझा 'मणिकर्णिका' चित्रपट पाहण्यास उत्सुक असल्याचे सांगितले तेव्हा माझ्या आणि माझ्या चित्रपटाविरोधात बदनामी मोहीम सुरू झाली. माझ्या चित्रपटात काम केलेल्या जवळपास सर्वच मुख्य कलाकारांना मला बदनाम करण्यासाठी पैसे दिले गेले. यानंतर, अचानक माझ्या आयुष्यातील सर्वात यशस्वी शनिवार व रविवार सर्वात वाईट अनुभवात बदलला. हा.. हा.. आता मला भीती वाटते.. खूप.. कारण तो पुन्हा उत्साही झाला आहे.'



## साराला फोटो काढल्याचा राग



सारा अली खान बुधवारी रात्री मुंबईतील एका थिएटरमध्ये दिसली. सारा तिच्या मैत्रिणींसोबत चित्रपट पाहायला गेली होती. तिथे ती पापाराझींवर संतापलेली दिसली. यावेळी सारा पांढऱ्या रंगाच्या सूटमध्ये पोहोचली होती. थिएटरच्या आतील एक व्हिडिओ सोशल मीडियावर समोर आला आहे. व्हिडिओमध्ये सारा तिच्या मैत्रिणींसोबत फूड काउंटरवर होती. यादरम्यान पापाराझी सतत तिचे फोटो काढत होते. आधी सारा हसली आणि पोझ देत बाय म्हणाली. पण पापाराझी ऐकले नाहीत आणि सतत तिचे फोटो आणि व्हिडिओ काढत राहिले, त्यानंतर सारा रागावली आणि ओरडली, 'सर, कृपया आता थांबा, मला हे आवडत नाही.' असे सारा म्हणाली.साराला पहिल्यांदाच रागात पाहून चाहते हैराण झाले आहेत आणि पापाराझीच्या या कृतीवर रागही काढत आहेत. साराला पाठिंबा देत एका यूझरने लिहिले की, 'ती अस्वस्थ नाही, पापाराझींनी तिला अस्वस्थ केले आहे'. दुसऱ्याने लिहिले, 'त्यांना एकटे सोडा'. तिसऱ्या यूजरने कमेंट करताना लिहिले की, त्याचेही वैयक्तिक आयुष्य आहे, त्यांना त्याचा आनंद घेऊ द्या.सारा अली खानच्या वर्कफ्रंटबद्दल बोलायचे तर 2 जून रोजी साराचा 'जरा हटके जरा बचके' हा चित्रपट प्रदर्शित झाला. या चित्रपटात विकी कौशल

## रामायणातून आलियाची माघार

प्रभास आणि क्रिती सॅनन स्टारर आदिपुरुष चित्रपटाच्या अपयशानंतर बॉलिवूडचे प्रसिद्ध दिग्दर्शक नितेश तिवारी यांनी रामायण बनवण्याचा निर्णय घेतला आहे. या चित्रपटात रणबीर कपूर रामाची भूमिका साकारणार असून आलिया भट्ट सीतेच्या भूमिकेत दिसणार असल्याच्या बातम्या बऱ्याच दिवसांपासून येत होत्या. मात्र ताज्या अपडेट्सनुसार, आलिया या चित्रपटात सीतेची भूमिका साकारणार नाही.पिंकविलाच्या वृत्तानुसार, आलियाने चित्रपटातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे तर रणबीर कपूर चित्रपटात रामची भूमिका साकारणार आहे. हा चित्रपट प्रेक्षकांसमोर मांडण्यासाठी चांगली कास्टिंग खूप महत्त्वाची आहे, असे निर्मात्यांना वाटते. सीतेच्या पात्रात आलिया भट्ट फिट बसत नसल्याने तिला भूमिका दिली जाऊ नसे असे निर्मात्यांना वाटत आहे.अनेक रिपोर्ट्समध्ये असाही दावा करण्यात आला आहे की, निर्मात्यांना शक्य तेवढ्या लवकर चित्रपटावर काम सुरू करायचे आहे. पण तारखेच्या कारणामुळे आलिया भट्टने या प्रकल्पातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. कलाकारांबाबत निर्मात्यांनी अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नाही. असे म्हटले जात आहे की, निर्माते आता चित्रपटात कास्ट करण्यासाठी नवीन सीतेच्या शोधात आहेत. आलिया भट्टच्या एक्झिटनंतर हा चित्रपट कोणत्या अभिनेत्रीकडे जाणार, हे पाहावे लागेल. आलिया आणि रणबीरशिवाय KGF स्टार यशचे नावही त्या चित्रपटाशी जोडले जात आहे. चित्रपटात रावणाची भूमिका साकारणार असल्याचे सांगण्यात येत आहे. यासाठी निर्मात्यांनी यशच्या अनेक लूक टेस्ट देखील केल्या आहेत. त्याचा लूक अजून फायनल झालेला नाही. यश या भूमिकेसाठी अद्याप फायनल झालेला नाही. यश हा चित्रपटाचा भाग नसल्याच्या बातम्याही यापूर्वी आल्या होत्या. वृत्तानुसार, निर्मात्यांना कलाकारांची निवड करण्याची घाई करायची नाही. चित्रपट अजून प्राथमिक अवस्थेत आहे.जुलैमध्ये बावलच्या प्रमोशन दरम्यान, दिग्दर्शक नितेश तिवारी यांना आगामी चित्रपटाच्या कलाकारांबद्दल विचारण्यात आले, तेव्हा त्यांनी रणबीर, आलिया आणि यश यांच्या कास्टिंगची पुष्टी केली किंवा नाकारली नाही. लवकरच त्याची घोषणा केली जाईल, असे ते म्हणाले.



# जो बचे हैं संग समेट लो'

पाकिस्तानी अभिनेते फवाद खान आणि माहिरा खान लवकरच नेटफ्लिक्सच्या पहिल्या पाकिस्तानी-ओरिजिनल शो - जो बचे हैं संग समेट लो मध्ये दिसणार आहे. व्हरायटीच्या रिपोर्टनुसार, या शोमध्ये फवाद-माहिरा व्यतिरिक्त सनम सईद आणि रझा मीर देखील दिसणार आहेत. हा शो कादंबरीकार फरहत इश्तियाक यांच्या याच नावाच्या पुस्तकावर आधारित आहे. सध्या हा शो चित्रिकरणाच्या टप्प्यावर असून त्याचे शूटिंग इटली, यूके आणि पाकिस्तानमध्ये सुरू आहे. फरहत इश्तियाकच्या पुस्तकावर आधारित हा दुसरा शो असेल ज्यामध्ये फवाद-माहिरा एकत्र दिसणार आहेत.याआधी माहिरा आणि फवाद खान यांनी 'द लीजेंड ऑफ मौला जट' आणि टीव्ही शो हमसफरमध्ये एकत्र काम केले आहे. हमसफर शो देखील फरहत इश्तियाक यांच्या पुस्तकावर आधारित आहे. फवाद-माहिरा स्टारर पाकिस्तानी ओरिजिनल शो हॉवर्ड युनिव्हर्सिटीचा विद्यार्थी सिकंदर आणि प्रतिभावान कलाकार लिसा यांच्या जीवनावर आधारित आहे, असे व्हरायटीच्या वृत्तात म्हटले आहे. दोघेही आपापल्या जीवनात अडचणींचा सामना करत असताना इटलीमध्ये भेटतात.या शोमध्ये सनम सईद आणि फवाद खान पुन्हा एकदा एकत्र दिसणार आहेत. याआधी दोघे बरजाख शोमध्ये एकत्र दिसले होते. याशिवाय शोमध्ये



अहद रझा मीर, हमजा अली अब्बासी, बिलाल अश्रफ, माया अली, इक्रा अजीज, हानिया आमिर, खुशहाल खान, नादिया जमील, ओमिर राणा आणि समीना अहमद दिसणार आहेत.हमसफर शो व्यतिरिक्त, फवाद-माहिरा पाकिस्तानी चित्रपट निर्माते बिलाल लाशारी यांच्या 'द लीजेंड ऑफ मौला जट' चित्रपटात एकत्र दिसले होते. चित्रपट दिग्दर्शक यूनुस मलिक यांच्या 1979 मध्ये आलेल्या मौला जट या चित्रपटापासून प्रेरित होता. सुमारे 45 कोटींच्या बजेटमध्ये बनलेल्या या चित्रपटाने पाकिस्तानी बॉक्स ऑफिसवर सुमारे 300 कोटींची कमाई केली. हा पाकिस्तानमधील आतापर्यंतचा सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट आहे. या शोशिवाय पाकिस्तानातील भारतीय-मूळ शो हिरामंडीदेखील लवकरच नेटफ्लिक्सवर प्रसारित केले जाईल. या मालिकेद्वारे दिग्दर्शक संजय लीला भन्साळी नेटफ्लिक्सवर पदार्पण करणार आहेत.

# फायनलमध्ये प्रज्ञानंदचा पराभव!

## » फायनलटायब्रेकरमध्ये कार्लसनने मारली बाजी

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**भारताचा ग्रँडमास्टर आर प्रज्ञानंदाचा जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या नॉर्वेच्या मॅग्नस कार्लसनविरुद्धच्या अंतिम सामन्यात टायब्रेकरमध्ये पराभव झाला. या पराभवामुळे भारताचा प्रज्ञानंद इतिहास रचण्यापासून मुकला.**



पहिल्या टायब्रेकरपर्यंत प्रज्ञानंदने कार्लसनला कडवी झुंज दिली, पण दुसऱ्या टायब्रेकरमध्ये कार्लसनने आपल्या खेळाची शैली बदलली आणि प्रज्ञानंदकडे याचे उत्तर नव्हते. त्यामुळे त्याला पराभवाचा सामना करावा लागला. बुद्धिबळ विश्वचषक २०२३ च्या दुसऱ्या टायब्रेकर सामन्यात भारताचा युवा ग्रँडमास्टर प्रज्ञानंद जगातील नंबर-1 खेळाडू कार्लसनच्या मागे पडला. यानंतर दोघांमधील फायनल स्कोअर कार्लसन १.५ तर प्रज्ञानंदसाठी ०.५ असा राहिला होता.

या सामन्यात १८ चालीनंतर क्वीन्स बदलण्यात आल्या, पण त्याचा फायदा कार्लसनला मिळाला.

टायब्रेकर सामन्यात दोन्ही खेळाडूंना २५-२५ मिनिटे मिळतात. त्याचबरोबर प्रत्येक चालीनंतर, खेळाडूच्या वेळेत १० सेकंद जोडले जातात. या विश्वचषकाच्या अंतिम फेरीतील पहिल्या २ सामन्यांबद्दल बोलायचे झाल्यास, पहिला सामना २२ ऑगस्ट रोजी झाला होता. यामध्ये प्रज्ञानंदने पांढऱ्या आणि कार्लसनने काळ्या मोहऱ्यांसह हा सामना खेळला, त्यानंतर ३५ चालीनंतर दोन्ही खेळाडूंनी हातमिळवणी केली आणि सामना अनिर्णित राहिला.

आर प्रज्ञानंद आणि मॅग्नस कार्लसन यांच्यातील दुसरा क्लासिकल सामना २३ ऑगस्ट रोजी खेळला गेला. यामध्ये कार्लसन पांढऱ्या मोहऱ्यांसह तर प्रज्ञानंद काळ्या मोहऱ्यांसह खेळला. या सामन्यातही दोन्ही खेळाडूंनी कोणतीही घाई दाखवली नाही आणि अखेर हा सामनाही अनिर्णित राहिला. ३० चालीनंतर दोन्ही खेळाडूंनी हस्तांदोलन करून सामना संपवला. बुद्धिबळ विश्वचषकाच्या अंतिम सामन्यातील प्रज्ञानंद हा तिसरा सर्वात तरुण खेळाडू आहे.

### विश्वचषक पटकावण्यापासून वंचित

» बुद्धिबळ विश्वचषक २०२३ च्या उपांत्य फेरीत मॅग्नस कार्लसनने अझरबैजानच्या निझात अब्बासोव्हचा १.५-०.५ ने पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला होता. त्याचबरोबर भारताच्या आर प्रज्ञानंधाने अमेरिकेचा अनुभवी ग्रँडमास्टर फॅबियानो कारुआनाचा ३.५-२.५ असा पराभव केला होता. २००२ नंतर प्रथमच, बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचला असला, तरी विजेतेपद पटकावण्यापासून वंचित राहिलेले भारतीय.

# टीम इंडियाचा सहा दिवसीय कॅम्प!

## » निवडलेल्या 18 पैकी 15 खेळाडू बंगळुरुला

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**आशिया कपच्या तयारीसाठी टीम इंडियाचे कॅम्प आजपासून म्हणजेच 24 ऑगस्टपासून बंगळुरूमध्ये सुरू होणार आहे. वृत्तानुसार, आशिया चषकासाठी जाणाऱ्या 18 खेळाडूंपैकी 15 खेळाडू बंगळुरूला पोहोचले आहेत. आयर्लंडहून आल्यावर जसप्रीत बुमराह, संजू सॅमसन आणि प्रसिद्ध कृष्णाही त्यांच्यासोबत सामील होतील.**



आलूर येथील कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशनच्या तीन ओव्हल कॅम्पसमध्ये गुरुवारी शिबिर सुरू होईल. शिबिराचा उद्देश विश्वचषकाची तयारी हाही असेल.बुमराह, सॅमसन आणि कृष्णा आज रात्री उशिरा डब्लिनहून बंगळुरूला पोहोचणार आहेत. उर्वरित 15 खेळाडू सुरुवातीच्या दिवशी म्हणजेच आज इनडोअर सत्रात भाग घेतील. शुक्रवारपासून, खेळाडूंना बॅचमध्ये विभागले जाईल आणि मैदानी कंडिशनिंग कार्यक्रम सुरू होईल. वेस्ट इंडिजमधील मालिकेचा भाग नसलेल्या वरिष्ठ खेळाडूंना गेल्या दोन आठवड्यांपासून वैयक्तिक फिटनेस आणि आहार योजनेचे पालन करण्यास सांगितले होते. यात नवीन काहीही नसले तरी जेव्हा खेळाडू मालिकेच्या मध्यभागी ब्रेक घेतात तेव्हा हा फिटनेस आणि डाएट प्लॅन पाळावा लागतो.संपूर्ण शिबिरात केएल राहुलच्या फिटनेसवर बारकाईने लक्ष ठेवले जाणार आहे. आशिया चषक संघात राहुलची निवड करण्यात आली आहे परंतु त्याला किरकोळ दुखापत झाली आहे ज्यामुळे आशिया चषकाच्या किमान पहिल्या दोन सामन्यांसाठी तो संशयाच्या भोवऱ्यात सापडला आहे. मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांनी सोमवारी संघाची घोषणा करण्यासाठी पत्रकार परिषद घेतली, ज्यातही याची पुष्टी करण्यात आली. वृत्तानुसार, नॅशनल क्रिकेट अकादमीवैद्यकीय संघ राहुलच्या फलंदाजीवर खूश आहे परंतु त्याच्या यष्टीरक्षणाचे काळजीपूर्वक निरीक्षण करत आहे. गेल्या आठवड्यात एनसीएमध्ये झालेल्या सराव सामन्यानंतर त्याने वेदना होत असल्याची तक्रार केली.तर श्रेयस अय्यर पूर्णपणे तंदुरुस्त आहे आणि पुनरागमन करण्यास तयार आहे. श्रेयस मार्चनंतर पहिल्यांदाच टीम इंडियाच्या कॅम्पचा भाग असेल. मार्चमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेत त्याला दुखापत झाली होती, तेव्हापासून तो देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेटपासून दूर आहे.

### राहुलच्या फिटनेसवर लक्ष

» शिबिरात केएल राहुलच्या फिटनेसवर बारकाईने लक्ष ठेवले जाणार आहे. आशिया चषक संघात राहुलची निवड करण्यात आली आहे परंतु त्याला किरकोळ दुखापत झाली आहे ज्यामुळे आशिया चषकाच्या किमान पहिल्या दोन सामन्यांसाठी तो संशयाच्या भोवऱ्यात सापडला आहे. मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांनी सोमवारी संघाची घोषणा करण्यासाठी पत्रकार परिषद घेतली, ज्यातही याची पुष्टी करण्यात आली. वृत्तानुसार, नॅशनल क्रिकेट अकादमी वैद्यकीय संघ राहुलच्या फलंदाजीवर खूश आहे परंतु त्याच्या यष्टीरक्षणाचे काळजीपूर्वक निरीक्षण करत आहे. गेल्या आठवड्यात एनसीएमध्ये झालेल्या सराव सामन्यानंतर त्याने वेदना होत असल्याची तक्रार केली.

# नदाल इन्फोसिसचा ग्लोबल ब्रँड ॲम्बेसेडर

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था



भारतातील आघाडीची आयटी कंपनी इन्फोसिसने गुरुवारी (24 ऑगस्ट) टेनिस स्टार राफेल नदालची नवीन जागतिक ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती केली. याची घोषणा करताना कंपनीने सांगितले की, नदाल त्यांच्या 'इन्फोसिस डिजिटल इनोव्हेशन' या ब्रँडचा अॅ म्बेसेडर म्हणून तीन वर्षांसाठी इन्फोसिसशी संलग्न असेल.नदालने डिजिटल सेवा कंपनीशी करार करण्याची ही पहिलीच वेळ आहे.

कंपनीने नदालसोबत तीन वर्षांची भागीदारी केली आहे. इन्फोसिसने एका निवेदनात म्हटले आहे की ते आणि नदालचे प्रशिक्षक संघ एकत्रितपणे कृत्रिम बुद्धिमत्ता वर आधारित सामना विश्लेषण साधन तयार करत आहेत. हे साधन नदालच्या संघाला त्यांच्या सामन्यांदरम्यान रिअल टाइमवर डेटाचे विश्लेषण करण्यास अनुमती देईल.

इन्फोसिसचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) आणि व्यवस्थापकीय संचालक (एमडी) सलील पारेख यांनी नदालचा कंपनीशी असलेला संबंध हा सन्मानजनक असल्याचे वर्णन केले आणि म्हटले की तो जगातील सर्वात प्रतिष्ठित खेळाडूंपैकी एक आहे. दुसरीकडे, नदालने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X वर स्वतःचा एक व्हिडिओ शेअर केला आणि म्हणाला, 'इन्फोसिस केवळ टेनिसशी संबंधित अनुभव वाढविण्यावर काम करत नाही, तर आमच्या समुदायातील लोकांना एक भाग होण्यासाठी सक्षम बनवत आहे. उज्ज्वल भविष्य. करतो.' नदाल पुढे म्हणाले की, टीम इन्फोसिसमध्ये ग्लोबल ब्रँड अॅ म्बेसेडर म्हणून सामील होण्यासाठी मी खूप उत्साहित आणि आनंदी आहे.